**बँक-खाते एक : फायदे अनेक**

मॅनेजर: रामराम, काका

गोपाळ: रामराम. या, या मॅनेजर साहेब. बसा साहेब.

मॅनेजर: माहीत आहे ना गावात बँक खाती उघडायची मोहीम सुरू आहे ते? तुम्ही दिसला नाहीत? खाते उघडायचे नाहीये का?

गोपाळ: काय खाते उघडणार साहेब? पैसे शिल्लकच नाही पडत. दोन घास कसे बसे खाऊ शकतो.

मॅनेजर: थोडे फार तर राहत असतील ना? मला सांगा, पान-बिडी, गुटका खाता का?

गोपाळ: पान-बिडी तर नाही पण गुटका खातो.

मॅनेजर: अच्छा, दिवस भरात किती पुड्या खाता?

गोपाळ: खात असेन चार-पाच.

पत्नी: चार-पाच??? अहो.... आठ - दहा पुड्या सहज खात असतील.

मॅनेजर: ही गुटक्याची पुडी केवढ्याला मिळते?

गोपाळ: साहेब, महागाई किती किती झाली आहे, गुटका तरी कुठे स्वस्त आहे? मी आपला दोन रुपयेवाला खातो.

मॅनेजर: म्हणजे दहा रुपये रोज गुटक्यावर खर्च करता. जर गुटका खाणे बंद केले तर रोजचे दहा रुपये तर वाचतील?

पत्नी: साहेब, कधी कधी तर याहून जास्त खातात.

मॅनेजर: आता रोजचे दहा, म्हणजे महिन्याचे झाले तीनशे आणि वर्षात तीन हजार सहाशे रुपये वाचवू शकता कि नाही?

गोपाळ: वर्षात तीन हजार सहाशे रुपये?

मॅनेजर: हो. आणि बँक खाते उघडून त्यात जर पैसे जमा केले तर बँक त्यावर व्याज देते ते वेगळेच! जर दर महिन्याला आवर्ती जमा योजनेमध्ये एक ठराविक रक्कम जमा केली तर त्यावर जास्ती व्याज मिळेल आणि मुदत पूर्ण झाल्यावर एकदम मोठी रक्कम पण मिळेल.

पत्नी: एवढे पैसे? आणि वर व्याज? मग तर आमचे पैसे किती तरी वाढतील! यातून तर आम्ही आमच्या कमळी साठी शिवण यंत्र पण घेऊ शकतो.

मॅनेजर: हे सांगा भाऊ, जर थोड्या फार पैशाची अचानक गरज पडली, काही आजारपण उद्भवले तर काय करता?

गोपाळ: साहेब, तसे थोडेसे पैसे तर बाजूला टाकलेले असतात. आणि जास्तीचे लागले तर सावकाराकडून कर्ज पण घेतो.

मॅनेजर: अच्छा, कुठे ठेवता पैसे?

गोपाळ: कुठल्यातरी मडक्यात किंवा कपड्यांच्या तळाशी.

पत्नी: मी तर कपड्यात गाठ बांधून धान्याच्या डब्यात लपवून ठेवते.

मॅनेजर: असे केले तर पैसे हरवण्याचा, चोरी होण्याचा किंवा उंदराने कुरतडण्याचा धोका असतो.

गोपाळ: खरं आहे सहेब. एकदा गावात पूर आला होता तर घरातल्या वस्तूंसोबत माझे सगळे पैसे पण वाहून गेले होते.

मॅनेजर: पहा. बँकेत जमा केले असते तर वाचले असते आणि वेळेवर कामाला पण आले असते!

गोपाळ: पण साहेब, बँक पण पाण्यात बुडाली होती.

मॅनेजर: अहो, खात्याचे सगळे हिशेब बँकेच्या मुख्य कॉम्प्यूटर मध्ये सुरक्षित असतात. त्यामुळे तुमचा पैसा पण सुरक्षित असतो. आणि तुम्ही कधी पण कुठून पण पैसे काढू शकता.

मॅनेजर: आता मी तुम्हाला खाते उघडण्याचे अजून फायदे सांगतो. मनरेगा योजनेद्वारे मिळणा-या रोजगाराचे पैसे, शाळा शिकणा-या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, सरकारी योजनांमधून मिळणारे अनुदान इत्यादी सगळे सरकारी लाभ सुद्धा आता बँक खात्यात जमा होणार. त्यासाठी पण बँक खाते उघडणे जरूरीचे आहे.

गोपाळ: म्हणजे तर सरकारी अनुदान मिळणे पण एकदम सुरक्षित होऊन जाणार!

मॅनेजर: आणि हो, दूरच्या गावात किंवा शहरात जर तुमचे कोणी नातेवाईक, ओळखीचे लोक राहत असतील तर त्यांना सुद्धा तुम्ही बँकेतून सहज पैसे पाठवू शकता. त्यांना पैसे लगेच मिळतात आणि ते पाहिजे तेव्हा काढू पण शकतात. तर आता सांगा, खाते उघडणे गरजेचे आहे ना?

गोपाळ: जरूर साहेब. माझे खाते कसे उघडू शकतो?

मॅनेजर: तुमच्या कडे आधार कार्ड आहे?

गोपाळ: हो साहेब. आहे.

मॅनेजर: फारच छान! मग तर तुमचे खाते उघडणे अगदीच सोपे आहे. जर तुमच्या मित्रांकडे किंवा नातेवाईकांकडे आधार कार्ड नसेल तर त्यांना ठिकठिकाणी चालू असलेल्या मोहिमांमध्ये खाते उघडायला सांगा.

गोपाळ: हो साहेब. सांगतो.

मॅनेजर: तसं पहायला गेले तर बँकेत खाते उघडायला फोटोसोबत ओळखपत्र आणि पत्त्याचा पुरावा देणे गरजेचे असते. रेशन कार्ड, वीज बिल, मतदान कार्ड, आधार कार्ड - यातील कुठला पण एक पुरावा चालेल.

गोपाळ: हे सगळे तर आहे आमच्याकडे. आणि आधार कार्ड पण आहे. मग तर आम्ही उद्याच येतो खाते उघडायला.

पत्नी: आणि तुम्ही गुटका खाणे बंद करा. उद्यापासून नाहि. आज पासूनच. आणि आजच जाऊन खाते पण उघडून या. सांगून ठेवते. हां . . .

किसन: गोपाळभाऊ, रामराम. कोणी पाहुणे आलेत का?

गोपाळ: अरे, किसनभाऊ! या, या. हे बँकेचे साहेब आलेत. यांनी आम्हाला बँकेत खाते उघडण्याचे फायदे सांगितले आणि आता आमचे खाते पण उघडून देणार. भाऊ, तुम्ही पण तुमचे खाते उघडाच.

पत्नी: साहेब, हे आमचे भाऊ आहेत. जवळच्याच गावात राहतात. पण त्यांच्या गावात तर बँकच नाही. मग तरी सुद्धा ते खाते उघडू शकतात का?

मॅनेजर: हो, का नाही? ते पण खाते उघडू शकतात. आमचा प्रतिनिधी, ज्याला बँक मित्र म्हणतात, तो मशीन घेऊन गावात येईल, खाती उघडेल आणि सगळी देव-घेव सुद्धा करेल. पैसे जमा पण करेल आणि मशीन मधून पावती पण काढून देईल.

किसन: आणि पैसे काढायचे असतील तर ते पण देईल?

मॅनेजर: हो देईल की! बँक मित्र गरज लागली कि पैसे पण देईल. खाते उघडले की बँक तुम्हाला रूपे कार्ड देईल ज्याचा उपयोग करून तुम्ही एटीएम मशीन मधून पैसे काढू शकता. आणि हो, रूपे कार्डसोबत एक लाखाचा अपघात विमा पण मोफत दिला जातो.

बँक मित्र मशीन वर तुमचा अंगठा टेकवून ओळख पटवेल आणि खात्यात जमा असलेल्या रकमेतून तुम्हाला पैसे काढून देईल.

किसन: नाही साहेब नाही. मी तर नाही अंगठा देणार.

मॅनेजर: अहो, घाबरू नका. बँक सावकाराप्रमाणे थोडाच अंगठा घेते? प्रत्येकाचे अंगठ्याचे ठसे वेगळे असतात. कोण्या एकाचा दुस-यासारखा नसतो. मशीन अंगठ्याच्या ठशावरून ओळखते कि हे खाते कोणाचे आहे.

गोपाळ: आणि सावकाराप्रमाणे हिशेबातही काही गोलमाल नाही. हो ना साहेब?

मॅनेजर: अहो बिलकुल नाही. बँक सगळ्या व्यवहारांची पावती देते आणि खाते पुस्तक पण देते ज्यात पैसे भरल्याच्या आणि काढल्याच्या सगळ्या नोंदी असतात. आणि हो,

आपण खात्याचे नामांकन करू शकता आणि खात्यात आपल्या मुलांचे आणि बायकोचे नाव पण जोडू शकता.

नंतर जेव्हा जरूर पडेल तेव्हा खात्यात पैसे नसले तरी बँक तुम्हाला पैसे कर्जाऊ देऊ शकते. असे कर्जाऊ घेतलेले पैसे जर तुम्ही वेळेवर फेडले, तर बँक तुम्हाला २००० रुपयापर्यंत कर्ज देऊ शकते. याला ओव्हरड्राफ्ट म्हणतात. बँक या ओव्हरड्राफ्टची मर्यादा ५००० रुपयापर्यंत वाढवू शकते.

बँकेने दिलेल्या या सुविधेमुळे आता तुम्हाला सावकाराकडे जाण्याची गरजच नाही पडणार.

किसन: साहेब माझा तर विश्वासच नाही बसत!

मॅनेजर: आता अजून एक फायदा सांगू बँक खाते उघडण्याचा? तुम्ही खाते समाधानकारक रित्या चालवता आहात हे बँक सहा महिने पाहील आणि तुम्हाला बँकेकडून अजून सुविधा, कर्ज वगैरे मिळू शकेल.

गोपाळ: पण या कर्जावर बँक व्याज तर लावणार ना?

मॅनेजर: व्याज तर लागणारच. पण अगदी कमी दराने.

किसन: साहेब, मी तर ऐकले आहे की बँक सावकारापेक्षा जास्त दराने व्याज घेते. खरं आहे का हे?

मॅनेजर: अरे! हे तर तुमची दिशाभूल करायला कोणी तरी सांगितलेले दिसते. पहा, बँक वर्षाला १२ टक्के दराने व्याज घेते. म्हणजे महीन्याचा दर झाला एक टक्का. सावकार तर तुमची जमीन पण गहाण ठेवून घेतो आणि व्याज पण लावतो महिना ५ टक्के दराने. करा हिशेब बँकेपेक्षा किती जास्त घेतो ते!

किसन: अरे बापरे... ! म्हणजे सावकार किती लुटत आलेत आम्हाला!

गोपाळ: इतकं कमी व्याज असेल तर आम्ही इतर कुठून कशाला, बँकेतूनच नाही का कर्ज घेणार? साहेब, बँक अजून कशा-कशासाठी कर्ज देते?

मॅनेजर: बँकेच्या खूप सा-या योजना आहेत.

बँक शेती, बी-बियाणे, खत, फवारणीसाठी लागणारी औषधे घेण्यासाठी कर्ज देते. तसेच ट्रॅक्टर व इतर अवजारे खरेदी करण्यासाठी पण कर्ज देते. इतकेच नाही, तर कुक्कुटपालन, मत्स्यपालन, पशुपालन आणि इतर अनेक प्रकारच्या कामधंद्यांसाठी पण बँक कर्ज मिळू शकते.

आणि ऐका, मुलांचे शिक्षण आणि घर बांधण्यासाठी पण बँक कर्ज देते.

पत्नी : मग तर माझ्या कमळीच्या शिवण यंत्रासाठी पैसे कमी पडले तर बँकेकडून कर्ज मिळेल. हो ना?

मॅनेजर: हो, पण कमळीला खूप शिकवा बरं का. त्यासाठी बँक तुम्हाला मदत करेल. आणि किसान क्रेडिट कार्ड, जनरल क्रेडिट कार्ड इत्यादी सुविधा आहेतच.

किसन: हे कार्ड कशासाठी असतं ? त्याने आपण काय करू शकतो?

मॅनेजर: हे कार्ड फार कामाचे आहे बरं का. जेव्हा तुम्ही जवळच्या शहरात खरेदीला जाता तेव्हा खिशात पैसे सुरक्षित राहत नाहीत. कधी पैसे पडले, खिसा कापला गेला तर किती त्रास होतो?

किसन: हो साहेब. कायम पैसे हरवण्याची भीती असते.

मॅनेजर: आता आपण कार्ड वापरून एटीएम मशीन मधून स्वतः सुद्धा पैसे काढू शकतो.

गोपाळ: पण साहेब, आम्ही ते एटीएम मशीन कसं चालवणार? आम्हाला तर नाही येत!

मॅनेजर: अरे ते तर अगदी सोपे आहे. कार्डाबरोबर आपल्याला एक पिन नंबर मिळतो, ज्याच्या मदतीने आपल्याला स्वतःचा एक चार आकडी गुप्त नंबर बनवायचा असतो. हा नंबर कायम लक्षात ठेवायचा आणि कधी कोणाला सांगायचा नाही.

गोपाळ: आणि साहेब मग?

मॅनेजर: मग मशीन मध्ये कार्ड घातल्यावर मशीन तो गुप्त नंबर विचारेल. तुम्ही बरोबर नंबर टाकलात तरच मशीन काम करेल आणि तुम्हाला काही प्रश्न विचारेल. खात्यातली शिल्लक जाणून घ्यायची आहे का? पैसे काढायचे आहेत का? पिन नंबर बदलायचा आहे का? वगैरे. मग जर तुम्हाला पैसे काढायचे असतील तर जितके काढायचे आहेत तो आकडा मशीनवरचे नंबर दाबून टाकायचा. बास! तेवढे पैसे आपोआप बाहेर येतील. त्याबरोबरच एक छोटीशी पावती पण बाहेर येईल ज्यात आपल्या खात्याची शिल्लक रक्कम लिहिलेली असेल.

किसन: अरे हे तर किती छान आहे. खरंच हे कार्ड फार कामाचे आहे.

मॅनेजर: एटीएम मधून तर कोणीही पैसे काढू शकतो. म्हणजे तुम्ही कुठेही गेलात तरी त्या गावातल्या किंवा शहरातल्या एटीएम मधून तुम्ही पैसे काढू शकता. कधी बँक मित्र नाही आला तर तुम्ही दुस-या बँकेच्या एटीएम मधून सुद्धा पैसे काढू शकता.

एवढेच नाही तर कार्डाच्या मदतीने तुम्ही दुकानात जाऊन सरळ खरेदी करू शकता आणि तितकी रक्कम तुमच्या खात्यातून आपोआप कापली जाते आणि दुकानदार तुम्हाला माल देतो.

गोपाळ: अरे वा! बिन पैशाची खरेदी!

किसन: हे तर फारच छान! अहो साहेब इथे मंडई मध्ये आम्हाला जुन्या, घाणेरड्या आणि फाटक्या नोटा मिळतात. आणि मग शहरातले दुकानदार आमच्याकडून अशा नोटा घेत नाहीत. आम्हाला नुकसान सोसून अर्ध्या किमतीमध्ये अशा नोटा बदलून घ्याव्या लागतात.

गोपाळ: आणि डोक्याला सुट्ट्या पैशांचा पण ताप होतो.

मॅनेजर: असं आहे काय? मग ऐका, बँकेत आपल्या जुन्या फाटक्या- तुटक्या नोटा बदलण्याची पण सोय आहे आणि बँकेत सुटी नाणी पण दिली जातात.

गोपाळ: अरे वा! पहा आम्हाला या कारणामुळे तर किती त्रास होत होता.

मॅनेजर: खरं तर आता आपली किती तरी कामे बँकेत न जाता सुद्धा होतात. बरं, तुमच्याकडे मोबाईल आहे का सांगा.

किसन : हो साहेब, हा आहे ना!

मॅनेजर: आता या मोबाईल मुळे आपली कितीतरी कामे बँकेत न जाता होऊ शकतात.

गोपाळ: ते कसे साहेब?

मॅनेजर: याला यूएसएसडी सुविधा म्हणतात. शाखेत जाऊन फॉर्म भरून देऊन वा एटीएम मार्फत आपला मोबाइल आपल्या खात्याला जोडावा लागेल. मग आपण ज्या प्रकारे एसएमएस पाठावतो तसा मेसेज पाठवून आपल्या खात्यावरील शिल्लक समजू शकते, खात्याचे छोटे विवरण मागू शकता व आपल्या कोणत्याही नातेवाईक अथवा मित्र वा इतर कोणासही पैसे पाठवू शकता.

गोपाळ: यामुळे तर आमची चांगलीच सोय होईल. पण आमच्याकडे तर फार चांगला किंवा महागाचा मोबाईल नाही.

मॅनेजर: हे काम कोणत्याही मोबाइल द्वारे होवू शकते.

किसन : पण साहेब त्यात काही धोका नाही ना? आमचे पैसे जातील वा कोणाला माहीत होतील!

मॅनेजर: हे एकदम सुरक्षित आहे. काळजीचे काही कारण नाही.

बँक आपल्या जीवनात आनंद आणण्यासाठी किती प्रयत्न करते याचे अजून एक उदाहरण देतो. बँकेने कितीतरी ठिकाणी ग्रामीण सल्ला केंद्रे उभारली आहेत.

गोपाळ: ती कशासाठी?

मॅनेजर: शेतक-यांना चांगल्या प्रतीची बी-बियाणे, खते, औषधे, नवीन तंत्रज्ञान, सिंचन वगैरेची माहिती मिळावी यासाठी.

किसन : त्यासाठी काही पैसे द्यावे लागतात का?

मॅनेजर: अरे नाही. हे सगळे मोफत आहे.

किसन: अरे वा! काय सांगता? बँक आमच्यासाठी किती काय काय करते!

मॅनेजर: तुम्ही पण बँकेची मदत करू शकता. आपल्या साथीदारांना पण ही माहीती द्या व त्यांना सांगा की प्रत्येक घरी कमीत कमी एक तरी खाते उघडले जावे अशी अपेक्षा आहे.

किसन: जरूर साहेब. गावातल्या सगळ्या लोकांना ही माहिती सांगून त्यांना खाती उघडण्यास समजावून सांगतो.

मॅनेजर: ठीक आहे. मी येतो आता. बँकेत जरूर या.

किसन: होय साहेब, हे तर आमच्या भल्यासाठीच आहे. जरूर येऊ.

गोपाळ: आपल्याला खूप खूप धन्यवाद साहेब. आपण आम्हाला खूप चांगली माहिती दिली.

पत्नी: हो. आता आमच्या जीवनात आनंद निर्माण होईल. आमची शेते हिरवीगार होतील. मुले चांगले शिक्षण घेतील व आम्ही आमची कामे अधिक चांगल्या प्रकारे पूर्ण करू शकू.

मॅनेजर: नक्की असेच होईल.....

# तुमच्या जमा-खर्चाचे मेळ पत्रक

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| नाव | गोपाळ | | जमिनीचे क्षेत्रफळ | ५ एकर | दुभती जनावरे | २ गाई |
| वय | ४५ वर्षे | | कुटुंबातील सदस्य | पत्नी, दोन मुले, वडील | | |

| जमा | | | | खर्च | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **महिना रुपये** | **विवरण** | **वार्षिक रुपये** | | **महिना रुपये** | **विवरण** | **वार्षिक रुपये** |
| शेती द्वारा | 10000 | 20 क्विंटल प्रति एकर व 12 रु प्रति किलो या दराने | 120000 | शेती साठी | 4167 | वीज, खत, औषधे, मजूरी साठी 1000 प्रति क्विंटल | 50000 |
| | | | | जनावारांसाठी | 2000 | चारा, औषधे इ 1000 प्रति गाय | 24000 |
| जनावारांद्वारा | 4000 | 2000 प्रति माह प्रति दुभती गाय | 48000 | जेवणखाण इ | 3000 | | 36000 |
| मेहनताना मजूरी, नोकरी | 0 | | 0 | आरोग्य | 500 | वडिलांची औषधे | 6000 |
| | | | | कपडे | 200 | वर्षभरचे (दिवाळी) | 5000 |
| व्यवसाय द्वारा | 1000 | एक छोटेसे किराणा दुकान | 12000 | शिक्षण | 200 | शाळेची फी 100 रुपये प्रत्येकी | 2400 |
| सरकारी अनुदान | 200 | वडिलांना (वय 65 वर्षे) 200 रुपये प्रति महिना | 2400 | घर | | घर दुरुस्ती | 10000 |
| | | | | करमणूक | 100 | मासिक 100 रुपये | 1200 |
| मालमत्ता विक्री | 0 | जुन्या ट्रैक्टर ची विक्री | 100000 | प्रवास खर्च | 150 | शहरात जाणे | 1800 |
| | | | | जुने कर्ज | | जुने ट्रैक्टर कर्ज | 50000 |
| | | | | सामाजिक कार्यक्रम | | वर्षभरचे | 500 |
| **एकूण** | **15200** | **एकूण** | **282400** | **एकूण** | **10117** | **एकूण** | **186900** |

# तुमच्या जमा-खर्चाचे मेळ पत्रक

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| नाव | | | जमिनीचे क्षेत्रफळ | | दुभती जनावरे | |
| वय | | | कुटुंबातील सदस्य | | | |

| **जमा** | | | | **खर्च** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **महिना रुपये** | **विवरण** | **वार्षिक रुपये** | | **महिना रुपये** | **विवरण** | **वार्षिक रुपये** |
| शेती द्वारा | | | | शेती साठी | | | |
| | | | | जनावारांसाठी | | | |
| जनावारांद्वारा | | | | जेवणखाण इ | | | |
| मेहनताना मजूरी, नोकरी | | | | आरोग्य | | | |
| | | | | कपडे | | | |
| व्यवसाय द्वारा | | | | शिक्षण | | | |
| सरकारी अनुदान | | | | घर | | | |
| | | | | करमणूक | | | |
| मालमत्ता विक्री | | | | प्रवास खर्च | | | |
| | | | | जुने कर्ज | | | |
| | | | | सामाजिक कार्यक्रम | | | |
| **एकूण** | | **एकूण** | | **एकूण** | | **एकूण** | |